लोकमत

# निवडणुकीची माहिती सादर करण्यास मुदतवाढ

## शिवाजी विद्यापीठ अधिसभेचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीबाबत ऑनलाईन स्वरूपात भरलेली माहिती अथवा अर्ज आवश्यक कागदपत्रांसह जमा करण्यास शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने बुधवार (दि.२० जुलै) सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात सध्या पाऊस मोठा प्रमाणात पडत आहे. पाऊसाच्या पाण्याने जिल्ह्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. त्यामुळे मुदतवाढ देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर, शिक्षक, विद्यापरिषदेमध्ये निवडून द्यावयाचे आठ शिक्षक, अभ्यासमंडळासाठी निवडून द्यावयाचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी तयार करण्यासाठी दिं. ११ जुलैपर्यंत ऑनलाईन स्वरूपात भरलेली माहिती अथवा अर्ज आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे जमा करण्याची मुदत दि. १५ जुलैपर्यंत होती. आता ती वाढविण्यात आली आहे, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
18 JUL 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर परीक्षा उद्यापासून

## परीक्षा विभागाकडून तयारी पूर्ण; ६५८ परीक्षा, २ लाख विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युतर परीक्षांना मंगळवार (दि. १९) पासून सुरुवात होणार आहे. परीक्षा विभागाकडून तयारी पूर्ण झाली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ६५८ परीक्षांसाठी सुमारे दोन लाख विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

विद्यापीठाच्या वतीने काही दिवसांपूर्वी उन्हाळी सत्र परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. यात केवळ लॉ आणि इंजिनिअरिंगच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्याचा निर्णय झाला. याच्याविरोधात विद्यार्थी संघटनांनी आंदोलने केली. काही विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयात




याचिका दाखल केली. काही दिवसांसाठी परीक्षा स्थगित करण्यात आल्या. त्यानंतर विद्यापीठ अधिकार मंडळाची बैठक होऊन विद्या परिषदेच्या मान्यतेनुसार आता सर्व परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्यात येणार आहेत.

पहिल्या टप्प्यात बीएस्सी, व बीएच्या अंतर्गत येणाऱ्या काही अभ्यासक्रमांच्या परीक्षांना १९ जुलैपासून प्रारंभ होईल. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २७६ महाविद्यालयांना 'एसआरपीडी' मोडद्वारे परीक्षेसाठीच्या 'ओएमआर' शीट पाठविल्या आहेत. अंतर्गत व बाह्य परीक्षकांची नेमणूक केली आहे. जिल्हानिहाय पर्यवेक्षकांची नियुक्ती केली आहे. सुरुवातीस प्रत्येक जिल्ह्यास तीन भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. २५ जुलैनंतर भरारी पथकांची संख्या वाढविण्यात येणार आहे. २५ जुलैपासून नियमित बीए, एमए.एस्ससी.सह बी.फ़ार्मसी, इंजिनिअरिंगच्या परीक्षा सुरू होतील. परीक्षांचे नियोजन पूर्ण झाले असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.